# ६. आपल्या गावाची ओळख

**करून पहा**

दिलेल्या शब्दकोड्यातून गावांची नावे शोधा.


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भं | जा | बी | ख | ड | की |
| डा | ल | ड | ड | दे | अ |
| रा | ना | शि | क | हू | को |
| सा | वं | त | वा | डी | ल्हा |
| ता | ठा | णे | स | भो | पू |
| रा | पु | सो | ला | पू | र |

- गाव कसे तयार होते ?

खूप प्राचीन काळी शेतीचा शोध लागण्यापूर्वी माणूस भटके जीवन जगत होता. त्या काळी तो जगण्यासाठी शिकार व कंदमुळे यांवर अवलंबून होता. पुढे शेतीचा शोध लागला. जमीन आणि पाणी यांच्या आधारे तो वस्ती करू लागला. पुढे माणसे एकाच ठिकाणी घरे बांधून राहू लागली. एकमेकांच्या सहकार्याने शेती करू लागली. त्यांची घरे एकमेकांच्या जवळजवळ असत. त्यांतून वस्ती तयार झाली. त्यांचा विस्तार झाला. अनेक वस्त्यांचे मिळून 'गाव' तयार झाले. त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

शेतीच्या शोधानंतर माणसांची कामे वाढली. ही सगळी कामे एकच व्यक्ती करू शकत नव्हती. म्हणून लोकांमध्ये कामांची वाटणी झाली. उदा., लाकडी अवजारे तयार करणे, त्यांची दुरुस्ती करणे, कापड विणणे, दागिने बनवणे, मातीची भांडी तयार करणे असे विविध व्यवसाय करणारे कारागीर निर्माण झाले.

- शेती करण्यासाठी कोणकोणती अवजारे लागतात?
- शेतीची जुनी अवजारे व आधुनिक अवजारे यांची माहिती मिळवा.
- कृषी प्रदर्शनाला भेट द्या.



## सांगा पाहू

- तुमच्या गावात कोणकोणत्या ऐतिहासिक वास्तू , वस्तू आहेत ?



गावात मंदिर, लेणी, मशीद, चर्च, स्मारक, किल्ला, वस्तुसंग्रहालय इत्यादी वास्तू असतात. या वास्तूंवरून गावाची ओळख निर्माण होत असते. ऐतिहासिक वास्तूंमधून आपल्याला आपल्या गावाच्या संपन्नतेचे दर्शन घडते. आपल्याला गावाचा इतिहास समजण्यास मदत होते. या वास्तू हा आपला मौल्यवान ठेवा आहे. तो सुरक्षित राहणे आवश्यक आहे. हा ठेवा जपणे ही आपली जबाबदारी आहे. गावाचा उरूस, जत्रा, एखादे धार्मिक स्थळ, किल्ला यांमुळे गावाचे नाव प्रसिद्ध होते. उदा., रायगड किल्ल्यामुळे रायगड जिल्हा ओळखला जातो.



**रायगड किल्ला**

## करून पहा

(१) तुमच्या गावाचे नाव कसे पडले, याची माहिती पालकांना किंवा शिक्षकांना विचारा.

(२) व्यक्ती, फळ, फूल, झाड, प्राणी, पक्षी, पाणी यांच्या नावांशी निगडित असणाऱ्या गावांची नावे शोधा व लिहून काढा.

प्रत्येक गावाला नाव असते. तसेच रस्ता, चौक, पेठ यांनाही नावे असतात. ही नावे कशी पडली, याचा शोध घ्या.

## माहीत आहे का तुम्हांला ?

छत्रपती शिवाजी महाराज सुरत येथून परत येत असताना नाशिक जिल्ह्यातील तळेगाव (दिंडोरी) या गावाजवळ थांबले. तिथे त्यांनी आपल्या सैन्याचा तळ ठोकला होता. त्यामुळे या गावाला ‘तळेगाव’ हे नाव पडले.

अहमदनगर जिल्ह्यातील धामणगाव पाट या गावाच्या परिसरात पूर्वी ‘धामण’ या नावाचे वृक्ष मुबलक प्रमाणात असल्यामुळे त्या गावाला ‘धामणगाव’ असे नाव पडले.

जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यात ‘आष्टी-धोतरजोड्याची’ नावाचे गाव आहे. तेथे पूर्वी उत्तम व तलम धोतरजोड्या तयार होत असत.त्यामुळे त्या गावाला ‘आष्टी-धोतरजोड्याची’ म्हणून ओळखले जाते.




शिवराम हरी राजगुरू हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख क्रांतिकारक होते. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव हे तीनही क्रांतिकारक प्रसिद्ध आहेत. पुणे जिल्ह्यात 'खेड' या गावी राजगुरूंचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षणानंतर ते अमरावतीस गेले. तेथे हनुमान व्यायामशाळेत त्यांनी देशभक्तीची दीक्षा घेतली. वयाच्या १५ व्या वर्षी संस्कृत भाषेचा अभ्यास करण्यासाठी ते बनारसला गेले. त्यांना मराठी, संस्कृत, हिंदी, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषा अवगत होत्या. सुखदेव आणि भगतसिंग यांच्याशी त्यांची विशेष मैत्री होती. पुढे राजगुरूंनी क्रांतिकार्यात भाग घेतला. देशासाठी त्यांनी हौतात्म्य पत्करले. त्यांची स्मृती म्हणून त्यांच्या खेड या जन्मगावास 'राजगुरूनगर' असे नाव देण्यात आले आहे.



### करून पहा

**जागतिक वारसा दिन :** १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून ओळखला जातो. या दिवशी एखादया किल्ल्याला किंवा राष्ट्रीय स्मारकाला भेट द्या. त्यांचे महत्त्व जाणून घ्या. जागतिक वारशाच्या संरक्षणासाठी कोणते नियम आहेत ? ते नियम संकलित करा.

- आपल्या परिसरातील ऐतिहासिक वास्तू, इमारती, जुने वाडे यांची चित्रे काढा.
  ती खालील चौकटींत चिकटवा.



गावाला किल्ला किंवा जुन्या वास्तू यांच्यामुळे जसा मोठेपणा मिळतो, तसाच तो गावातील माणसांमुळे व त्यांच्या महत्त्वाच्या कार्यामुळेदेखील मिळतो. आपल्या परिसरातील सैनिक, लेखक, कलावंत इत्यादींची माहिती गोळा करा. त्यांना शाळेत निमंत्रित करून त्यांची मुलाखत घ्या.



### माहीत आहे का तुम्हांला ?



संत गाडगे महाराजांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होय. त्यांचे मूळ गाव अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव (शेणगाव) आहे. संत गाडगेबाबांनी कीर्तनाद्वारे लोकजागृती केली. कीर्तनातून ते लोकांना प्रश्न विचारत आणि स्वत:च उत्तर देत. 'आपली माणसं गरीब का राहिली? तर त्यांच्यापाशी विद्या नाही म्हणून.' तेव्हा ते लोकांना 'शिका' असे आवाहन करत असत. त्यांना विसाव्या शतकातील एक थोर संत म्हणून ओळखले जाते. त्यांच्या जनसेवेच्या कार्यामुळे त्यांच्या गावाचे नाव अजरामर झाले आहे.



आठवडा बाजार



वाहतुकीची साधने

## करून पहा

गावच्या आठवडा बाजारात जाऊन एखाद्या दुकानदाराला भेटा. पुढील प्रश्नांच्या आधारे त्याची मुलाखत घ्या.

(१) तुम्ही किती वर्षे हा व्यवसाय करत आहात ?

(२) तुमच्या दुकानात कोणकोणत्या वस्तू विक्रीला असतात ?

(३) तुम्ही वस्तू कोठून आणता ?

(४) वस्तूंच्या वाहतुकीसाठी कोणकोणत्या साधनांचा वापर केला जातो ?

दैनंदिन गरजा भागवण्यासाठी गावातील लोक आठवडे बाजारावर अवलंबून असतात. या बाजारात गरजेच्या सर्व वस्तू मिळतात. यांत प्रामुख्याने अन्नधान्य, भाजीपाला, शेतीची अवजारे, कपडे इत्यादी वस्तू उपलब्ध होतात. बाजाराच्या निमित्ताने गावाच्या परिसरातील लोक एकमेकांना भेटतात. त्यांना त्यांची खुशाली समजते.

## माहीत आहे का तुम्हांला ?



गाढवांचा बाजार

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या लोकदैवतांच्या यात्रेत विविध जाती-जमातींचे लोक श्रद्धेने सामील होतात. त्यांच्या जगण्याशी संबंधित व्यवहारही तेथे होत असतात. त्याचाच एक भाग म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे बाजार तेथे भरतात. उदा., पुणे जिल्ह्यातील जेजुरी व अहमदनगर जिल्ह्यातील मढी ही तीर्थक्षेत्रे गाढवांच्या बाजारासाठी प्रसिद्ध आहेत. तसेच नांदेड जिल्ह्यातील माळेगाव या तीर्थक्षेत्री घोडे आणि गाढवे यांचा बाजार भरतो. अशा बाबींमुळेही गावाची ओळख होते.

### काय करावे बरे ?

आठवडा बाजार व वाहतुकीची साधने या दोन चित्रांचा संबंध तुम्हांला जोडता येतो का ?

### करून पहा

शेजारील चौकटीत व्यक्तीचे नाव, गावाचे नाव, नातेसंबंध, प्राण्याचे नाव, भाजीचे नाव दडलेले आहे. ते शोधा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| को | वे | को | मा | सो | म |
| आ | ल्हा | शे | का | ला | क |
| का | का | पू | र | ही | रं |
| दी | र | दा | र | ळ | द |
| अ | भि | जी | त | मे | थी |

### आपण काय शिकलो

- अनेक वस्त्यांचे मिळून गाव तयार होते.
- शेतीच्या शोधानंतर माणसांची कामे वाढली.
- ऐतिहासिक वास्तूंमुळे काही गावांची ओळख निर्माण होते.
- गावातील माणसे व त्यांच्या महत्त्वाच्या कार्यामुळे गावाला मोठेपणा मिळतो.
- बाजारात गरजेच्या वस्तू मिळतात.

## स्वाध्याय

**(अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) गावात कोणकोणत्या वास्तू असतात ?

(२) गावाचे नाव कशामुळे प्रसिद्ध होते ?

**(आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(१) रायगड किल्ल्यामुळे ............... जिल्हा ओळखला जातो.

(२) दैनंदिन गरजा भागवण्यासाठी गावातील लोक ............... बाजारावर अवलंबून असतात.

### उपक्रम

(अ) तुमच्या परिसरात असलेल्या वास्तूंची माहिती मिळवा.

(आ) तुमच्या गावाबद्दलची माहिती मिळवा.

***